वाचून :-१) या कार्यालयाकडुन वर्तमानपत्रात देण्यात आलेली जाहीरात दि.४-१०-२०२४
२) मुळ कागदपत्र तपासणी व समुपदेशन प्रक्रिया दिनांक १२/०२/२०२५
३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा यांची मंजुर टिपणी दि.27/०३/२०२५

.................................................................................................................................

जा.क्र/आरोग्य/आस्था/नियुक्ती/ 07 /२५
१५ वा वित्त आयोग, जि.प. सातारा
दि :-७/०३/२०२५

## १५ वा वित्त आयोग अंतर्गत स्टाफ नर्स पदांचे कंत्राटी नियुक्ती आदेश

१५ वा वित्त आयोग अंतर्गत सातारा जिल्हा परिषद, सातारा कार्यालयातंर्गत (नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र (UHWC) व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे- आपला दवाखाना मध्ये खालील नमुद कर्मचारी यांना दिनांक०७/०४/२०२५ ते दिनांक २९/०६/२०२५ पर्यंत निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी नियुक्ती आदेश देणेत येत आहे. उमेदवारांना नियुक्ती आदेश हे फक्त गुणवत्तेनुसार व प्रवर्गानुसार निर्गमित करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | कर्मचारी नाव | मुळ प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | तालुका | पसंतीक्रमांनुसार नियुक्ती ठिकाण | मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुलाणी परवीन हमीद | Open | Open | पाटण | आपला दवाखाना-बुधवार पेठ पाटण | रु. २००००/- |
| २ | वाघमारे पोर्णिमा शरद | SC | SC | खटाव | नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र आदिनाथनगर वडुज | रु. २००००/- |
| ३ | कांबळे प्रतिभा मुकींदा | SC | SC | कोरेगांव | नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र साठेनगर,रहिमतपुर | रु. २००००/- |
| ४ | वसावे विवेक सुकन्या | ST | ST | जावली | आपला दवाखाना-गांधीनगर, मेढा | रु. २००००/- |

**अटी व शर्ती:-**

१) राष्ट्रीय आरोग्य अभियान,जि.प. सातारा, मुख्य कार्यालयाकडून पारित केलेले आदेश (नियुक्ती, पुनर्नियुक्ती, बदली आदेश) सर्व १५ व्या वित्त आयोग अंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांना लागू राहतील.

२) सदर नियुक्ती आदेश दिलेल्या तारखेपासुन कार्यालयीन ७ दिवसांत दिलेल्या नियुक्ती ठिकाणी उमेदवारांनी हजर होणे बंधनकारक आहे.

३) नियुक्ती किंवा नविन नियुक्ती आदेश या कार्यालयाकडून ज्या अधिकारी/कर्मचारी यांना देणेत आलेली आहे त्या अधिकारी/कर्मचारी यांची बदली किंवा प्रतिनियुक्ती इतर कोणत्याही विभागात किंवा त्याच विभागात करता येणार नाही.

४) या कार्यालयाकडुन देणेत आलेला नियुक्ती आदेश किंवा नियुक्ती आदेशाने नेमणुक करणेत आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना राजीनामा द्यावयाचा असेल तर जिल्हा कार्यालयाकडुन राजीनामा मंजुर होईपर्यंत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना संस्था स्तरावरुन कार्यमुक्त करता येणार नाही. कर्मचारी कार्यमुक्तीचे आदेश एनएचएम जिल्हा कार्यालयाकडुन मा. मु.का.अ. यांची मंजुरी घेतलेनंतर निर्गमित करणेत येतील.

५) १५ व्या वित्त आयोग अंतर्गत अंतर्गत काम करीत असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना आपला स्वत:चा मोबाईल फोन २४ तास जिल्हा कार्यालयाशी संपर्कात ठेवावा लागेल.

६) १५ व्या वित्त आयोग अंतर्गत अंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्येक आर्थिक वर्षात ८ नैमित्तीक रजा व ७ वैद्यकिय रजा मंजुर आहेत व महिला कर्मचारी यांचेसाठी प्रसुती रजा ६ महिने कालावधीसाठी मंजूर आहे.

७) सुट्टीच्या दिवशी कार्यालयाचे काम केले असल्यास त्यासाठी बदली सुट्टी मंजुर नाही.

८) हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व नागरी आरोग्य केंद्रांचे दैनंदिन कामकाजाची वेळ सकाळी ०९.०० ते दुपारी १२.०० व सायंकाळी ०५.०० ते रात्री ०८.०० पर्यंत राहिल.

९) १५ व्या वित्त आयोग अंतर्गत अंतर्गत कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी नियुक्ती कालावधी संपणेपुर्वी १ महिना अगोदर नियुक्ती प्रस्ताव जिल्हा कार्यालयाकडील पत्र मिळालेनंतर मुदतीत सादर करावा. नियुक्ती प्रस्ताव वेळेत सादर न केलेस संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना पुढील कालावधीसाठी नियुक्तीची आवश्यकता नाही असे समजुन संबंधितांना कामावरुन कमी केले जाईल.

१०) सदरची नेमणुक तात्पुरत्या स्वरुपाची असुन कंत्राटी कालावधी संपल्यानंतर संबंधित पदावरील आपली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल यासाठी आपणांस कोणत्याही प्रकारची पूर्वसुचना व कारण न देता कमी करण्याचा हक्क जिल्हास्तरावर राखुन ठेवलेला आहे.

११) उमेदवारास त्यागपत्र/राजीनामा द्यावयाचे झाल्यास १ महिन्याची आगाऊ नोटीस अथवा १ महिन्याचे मानधन रोख भरावे लागेल. सदरची नेमणुक चांगल्या वर्तणुकीवर अवलंबुन राहील.

१२) वार्षिक कामाचे अहवालावरुन मुल्यमापन केले जाईल, काम असमाधानकारक आढळल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता कामावरुन कमी करणेत येईल.

१३) वरील पदे ही निव्वळ कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपाची आहेत. केंद्र शासनाने एखादे पद नामंजुर केल्यास त्या पदावर नेमणुक करणेत आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येतील. तसेच सेवा नियमित करण्याबाबत तक्रारी अगर न्यायालयीन दावा दाखल करता येणार नाही.

१४) दिनांक०७/०४/२०२५ ते दिनांक २९/०६/२०२५ या कालावधीची नियुक्ती १५ व्या वित्त आयोग अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२४- २५ च्या अधीन राहुन देणेत येत आहे. केंद्र शासनाने सन २०२४-२५ करीता कोणत्याही पदास मान्यता दिली नाही अथवा भविष्यात इतर कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उदभवल्यास सदर पदावरील कर्मचाऱ्यांची सेवा कोणतीही पूर्वसुचना व कोणतेही कारण न देता तात्काळ संपुष्टात आणली जाईल.

१५) मा. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या संदर्भ क्र ३ च्या पत्रानुसार एनएचएम अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या पदस्थापनेत बदल करण्याबाबतचे कोणतेही अर्ज अथवा शिफारस जिल्हा आरोग्य सोसायटीस सादर करु नयेत, तसे अर्ज प्राप्त झालेस त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१६) करारपत्रात मुद्दा क्रं 8.C VI नुसार जर एखादा कंत्राटी अधिकारी/कर्मचारी ३ महिने विनापरवानगी रजेवर/गैरहजर असल्यास त्याची सेवा समाप्त होईल अशी नविन अट समाविष्ट करण्यात आली आहे. सदर अटीनुसार वैद्यकिय अधिक्षक सर्व व वैद्यकिय अधिकारी, नागरी आरोग्य केंद्र सर्व यांनी अशा कर्मचाऱ्यांचे सेवासमाप्त करणेचे प्रस्ताव जिल्हास्तरावर जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, एनएचएम यांचेकडे सादर करावेत.

१७) अभियानांतर्गत विविध स्तरावर पदभरती करण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्ती आदेशात नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत असुन ही नियुक्ती १५ वा वित्त आयोग प्रकल्प संपुष्टात येईपर्यंत किंवा करारपत्र कालावधी समाप्ती नंतर संपुष्टात येईल.

१८) उमेदवाराने हजर होताना सबंधित तालुक्याच्या तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाकडे रु.१००/- च्या बॉंडपेपरवर करारनामा भरुन जमा करणेचा आहे. तदनंतरच उमेदवारास (UHWC) आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये हजर करुन घेतलेनंतर हजर अहवाल जिल्हा कार्यालयास सादर करावा.

(डॉ. महेश खलिपे) ५/५/२५

जिल्हा आरोग्य अधिकारी,

जिल्हा परिषद, सातारा